PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धीकरिता**

# वैविध्यपूर्ण स्पर्धांनी 'वर्सटाईल' बनला पार्ले महोत्सव

मुंबई दि. २१: पार्ले महोत्सवामधील आठव्या दिवशी झालेल्या वैविध्यपूर्ण स्पर्धांची मेजवानी पार्लेकरांना मिळाली. नुकत्याच जन्मलेल्या तान्ह्या बाळापासुन ते जेष्ठ नागरिकांच्या खास स्पर्धांमधील येणारे सर्व वयातील स्पर्धक तसेच कला क्रिडा स्पर्धांच्या विविधेतेमुळे १४ वा पार्ले महोत्सव वसर्टाईल बनला होता. 'कुछ खास है हम सभी में' या पार्ले महोत्सवाच्या घोष वाक्याप्रमाणे प्रत्येकामधील गुणांसाठी कोणतीना कोणती स्पर्धा पार्ले महोत्सवामध्ये आम्ही घेतो, असे प्रमुख आयोजक ॲड. पराग अळवणी यांनी सांगितले.

आठव्या दिवशी बालकांसाठी 'सुदृढ बालक स्पर्धा', महिलांसाठी 'होम मिनीस्टर', तरुणांसाठी 'शरिर सौष्ठव' तर जेष्ठ नागरिकांसाठी विशेष स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये सुमारे १००० हजार स्पर्धकांनी भाग घेतला होताच परंतु आपल्या पाल्यांच्या प्रथम स्पर्धेसाठी त्यांचे पालक, आपल्या आईला प्रोत्साहन देण्यासाठी आली त्यांची मुले व आजी आजोबांना स्पर्धेला घेऊन आलेली नातवंडांनी महोत्सवात एक वेगळेच 'पारिवरीक माहोल' तयार झाला होता. तर मानाची समजली जाणारी पार्ले महोत्सवाची शरिर सौष्ठव स्पर्धेमधील शरिर सौष्ठवपटूंना पाहण्यासाठी मुंबईतील सुमारे पाच हजार तरूण उपस्थित होते. वय वर्ष ५ ते १५ व १५ वर्षांवरील वयोगटातील समूह नृत्य पाहण्यासाठी स्पर्धकांचे पालक व मित्र परिवारने मोठ्या संख्येने गर्दी केल्यामुळे आठव्या दिवशी वैविध्यपूर्ण अशा कार्यक्रमांची मेजवानी पार्लेकरांना मिळली.

१४ व्या पार्ले महोत्सवाच्या आठव्या दिवशी साठ्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कविता रेगे, मुंबई भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार, प्रदेश उपाध्यक्ष जय प्रकाश ठाकूर, दादोजी कोंडदेव पुरस्काराचे मानकरी भाई कदम, चेतन पाठारे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मधुकर थोरात हे मान्यवर उपस्थित होते.तर या वेळी, कॉमनवेल्थ गेम्समध्ये निवड झालेला तुशार गितये, राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता अक्षय तरळ, मिलिंद पूर्णपात्रे, टेबल टेनिस राज्यस्तरीय विजेता मंदार हर्डीकर, तसेच मुंबई ते कन्या कुमारी मोटर सायकल प्रवास करत स्वामी विवेकानंदांचा विचारांचा प्रचार करणारे मुकुंद मोडक, वरुण घैसास, पुष्कराज परांजपे व सौरभ ओक यांचा सत्कार करण्यात आला.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.